# महाराष्ट्र शासन
## (जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद पालघर)
## स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)
## Expression of Interest Notice

**स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था म्हणून काम करु इच्छिणा-या संस्थांची विहित नमुन्यात सुची तयार करण्यासाठी आवेदन**

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत पालघर जिल्ह्यात सन २०२२-२३ साठी निवडक ग्रामपंचायतीमधील गावामध्ये प्लास्टिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प कामांकरिता सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे, प्रकल्प आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/सहाय्य प्रदान करणे करिता पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील काम करणा-या व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था यांचेकडून खालील अटी व शर्तीच्या अधीन अर्ज मागविण्यात येत आहेत. याबाबत कामाचे प्रारुप, अटी व शर्ती www.zppalghar.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

| | |
|---|---|
| **अर्ज स्विकारण्याची मुदत** | दि २८/१२/२०२२ रोजी पासुन पर्यंत दि. ३/१/२३ सा. ६ वा. |
| **अर्ज स्विकृतीचा पत्ता** | पाणी व स्वच्छता विभाग, दालन क्रमांक २११, जिल्हा परिषद पालघर, कोळगाव. |

➢ **प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेन्ट प्रकल्प आराखड्यामध्ये खालील बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे.**

१. श्रेडींग मशिन
२. बेलिंग मशिन
३. डस्ट रिमूव्हर मशिन
४. प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्ष शेड बांधकाम
५. गावातील प्लास्टिक कचरा संकलन पासून PMPU प्रक्रिया प्रकल्पापर्यंत वहन.
६. प्लास्टीक कच-याचे पुर्नचक्रीकरण (Recycling) व पुर्नवापर (Reuse)
७. प्लास्टिक कचरा व्यवस्थापन देखभाल व दुरूस्ती

सदर अंग/उपअंग (Component) चा सामावेश करून अद्ययावत उपायांसह (Technology) शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल ( DPR) तयार करून पुढील कार्यवाहीसाठी या कार्यालयात सादर करावा.

याकरिता इच्छुक व अनुभवी संस्था यांच्याकडून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती**

**अ) नोंदणी -**

१. संस्था ही लागू असलेल्या अधिनियमाद्वारे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेकडे स्वत:ची आयकर नोंदणी (Pan Card) वस्तू व सेवा कर नोंदणी (GST) असावी.
३. मागील तीन वर्षाचे आयकर भरणा (I.T. Return) आणि वस्तू व सेवा कर भरणा केलेला असावा.

**ब) अनुभव -**

१. संस्थेस प्लास्टिक कचरा व्यवस्थापन / स्वच्छ भारत अभियान टप्पा -२ मध्ये समाधानकारक कामाचा अनुभव असावा, तसे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.
२. पालघर जिल्ह्याचा अभ्यास व येथे संबधीत कामाचा अनुभव असणा-या संस्थेस प्राधान्य देण्यात येईल.

CamScanner

क) निवड प्रक्रिया -

१. प्राप्त अर्जातुन छाननी करून अनुभवाचे आधारे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीद्वारे निवड करण्यात येईल.

२. प्राप्त कागदपत्रांचे आधारे निवड करणे शक्य होत नसलेस संस्थाना समक्ष सादरीकरणासाठी बोलविण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत आहेत.

ड) कामाच्या अटी -

१. स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत स्वच्छताविषयक कामाचा, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कामाचा अनुभव असलेल्या संस्थाना प्राधान्य देण्यात येईल.

२. जागेची उपलब्धता/परवाने यांची खात्री करुन प्रस्ताव सादर करावेत. तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी मिळेपर्यंत त्यामध्ये होणा-या बदलानुसार प्रस्तावातील बदल आहे त्याच किमतीत संस्थेला करावा लागेल.

३. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तपासणी करुन दिलेल्या नमुन्यानुसार व बरोबर असल्याची खात्री करुन वरिष्ठ कार्यालयाच्या परवानगीने व निर्देशानुसार, एम्पॅनेमलमेंट अनुभवी संस्था/ सेल्फ हेल्प ग्रुप/एनजीओ/ खाजगी संस्था यांनी सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे तांत्रिक सल्ला/ सहाय्य प्रदान करणे या बाबी करिता, जिल्हास्तरिय प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेंट, याकरिता प्रत्येकी अनुज्ञेय असलेल्या निधीच्या ५% किंवा रुपये १,०००,००/- (रुपये एक लाख फक्त) यापैकी जी कमी असेल त्या रकमेच्या मर्यादेपर्यंत अनुभवी संस्था/ सेल्फ हेल्प ग्रुप/एनजीओ/खाजगी संस्था यांना शुल्क म्हणून शासन स्तरावरुन निधी उपलब्ध झाल्यानंतरच जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन मार्फत अदा करण्यात येईल.

४. सविस्तर प्रकल्प अहवालाचा अभ्यास करून प्रकल्प राबविण्याचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर निश्चिती झालेनंतरच सविस्तर प्रकल्प अहवालाकरीता अनुज्ञेय संस्था शुल्क संस्थेला देय असेल.

५. प्लास्टिक कचरा व्यवस्थापन चे काम करीत असताना केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णयामधील मार्गदर्शक सुचनांनुसार काम करणे बंधनकारक आहे.

६. आदेशाच्या तारखेपासून ३० दिवसात सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) व अंदाजपत्रके करुन या कार्यालयाकडे पुढील कार्यवाही करीता सादर करावेत.

७. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेस मुदतीपेक्षा जास्त विलंब झाल्यास संस्था दंडास पात्र राहील. (दंड किती आकारावयाचा याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश अंतिम राहतील.)

८. वेळोवेळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पावस्व) व मा. कार्यकारी अभियंता (ग्रापापु) तसेच वरिष्ठ कार्यालयाने दिलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करावी लागेल.

९. निवड केलेल्या संस्थेने विहीत रकमेच्या मुद्रांकावर करारनामा सादर करावा लागेल.

१०. निवड केलेल्या संस्थांचे करार कोणतेही कारण न देता रद्द करणेचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे राखून ठेवण्यात आले आहेत

(अतुल पारसकर)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी**
**पाणी व स्वच्छता विभाग**
**जिल्हा परिषद पालघर**

(भानुदास पालवे, भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

CamScanner

# जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष
# जिल्हा परिषद पालघर

## स्वारस्य अभिव्यक्ति (EOI) फॉर्म

कामाचे नाव :- स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत तालुक्यामध्ये प्लास्टिक कचरा व्यवस्थापन करणेकरिता जिल्हास्तरावर अनुभवी संस्था/सेल्फ हेल्प ग्रुप/एनजीओ/खाजगी संस्था यांचे एम्पॅनेलमेंट करणेस मान्यता मिळणेबाबत...

व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था नाव व पत्ता:- ----------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

# परिशिष्ट १

## निविदेचा अर्ज

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १ | कामाचे नाव | प्लास्टिक कचरा व्यवस्थापन |
| २ | अनुभवी संस्था/सेल्फ हेल्प ग्रुप/एनजीओ/खाजगी संस्था | |
| ३ | मुख्य/ जबाबदार व्यक्तिचे नाव | |
| ४ | पॅन कार्ड नंबर | |
| ५ | GST नंबर | |
| ६ | आधार कार्ड नंबर | |
| ७ | पत्ता | |
| ८ | मोबाईल नंबर | |
| ९ | मागील ३ वर्षाचे उलाढाल | |
| १० | जाहिरातीत नमूद केलेले कामाबाबतचे अनुभव | |

CamScanner